# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-11.05.2026** **वार- सोमवार**

---

**<u>बालभारती</u>**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात 'बालभारती'तर्फे 2026-27 या शैक्षणिक वर्षापासून काही इयत्तांसाठी नव्या अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकं प्रकाशित करण्यात येणार आहेत. यावर्षी जूनमध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीची नवीन पुस्तकं उपलब्ध होणार आहेत, त्यामुळे पालकांनी नव्या अभ्यासक्रमाचीच पुस्तकं खरेदी करावीत, असं आवाहन 'बालभारती'च्या संचालिका अनुराधा ओक यांनी केलं आहे. यासंदर्भात 'बालभारती'ने अधिकृत पत्रक प्रसिद्ध करून कोणती पुस्तकं घ्यावीत आणि कोणती टाळावीत याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

**<u>शंभरावं साहित्य संमेलन</u>**

महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्थळाची घोषणा येत्या १४ जून रोजी करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक संमेलनासाठी सहसंयोजक म्हणून; पुणे नगर वाचन मंदिर आणि पुणे पुस्तक महोत्सव या दोन संस्था इच्छुक आहेत. महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक काल झाली; यावेळी अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह डॉक्टर स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांनी पदाची सूत्र स्वीकारली.

**<u>पुरस्कार</u>**

आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे, या हेतूने इतिहास संशोधन क्षेत्रातील शिलेदार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि शिवभूषण निनाद बेडेकर यांचं कार्य महान आहे, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी काल पुण्यात काढले. इतिहासाच्या पाऊलखुणा बहुउद्देशीय संस्था, पाञ्चजन्य फाऊंडेशन आणि रावसाहेब चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीनं यंदाचा शिवभूषण निनादराव बेडेकर स्मृती पुरस्कार काल बलकवडे यांना प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

कला आणि स्थापत्यशास्त्र तज्ञ डॉ. अरविंद जामखेडकर यांच्या हस्ते बलकवडे यांना गौरवण्यात आलं. हिंदुस्थानात लढाई हरलेल्या अलेक्झांडरला जगज्जेता ठरवून आजही इतिहासाच्या अभ्यासक्रमात पहिला धडा त्याच्याविषयी का आहे, असा प्रश्न बलकवडे यांनी यावेळी उपस्थित केला. महाराष्ट्राचा इतिहास एनसीइआरटीच्या पाठ्यापुस्तकाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी इतिहासाच्या अभ्यासकांना पुन्हा एकदा एकत्र यावं लागेल असं ते म्हणाले.

**आकाशवाणी**

आकाशवाणीच्या ९०व्या वर्षपूर्तीनिमित्त पुणे आकाशवाणीनं रसिक श्रोत्यांसाठी उद्या एका सांगीतिक मैफिलीचं आयोजन केलं आहे. 'अगर है शौक मिलने का' या कार्यक्रमात संगीतकार राहुल श्रीवास्तव यांच्यासह राजेश दातार, मृण्मयी फाटक, सावनी लाड यांचं गायन रसिकांना ऐकता येणार आहे. उद्या मंगळवारी संध्याकाळी ६ वाजता, कोथरूडच्या बाल शिक्षण मंदिर सभागृहामध्ये हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

**सानेगुरुजी समता पुरस्कार**

राष्ट्र सेवा दलाच्या वतीने देण्यात येणारा 'साने गुरुजी समता पुरस्कार' यंदा डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांना जाहीर करण्यात आला आहे. येत्या ४ जून रोजी पुण्यातील साने गुरुजी स्मारक इथं हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून देशभर सामाजिक सद्भावना, समता आणि बंधुतेचा संदेश पोहोचवत आहेत. समाजातील विविध घटकांमध्ये सलोखा निर्माण करण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

**लोक अदालत**

पुण्यात गेल्या वर्षी एका रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला लोकअदालतीच्या माध्यमातून न्याय मिळाला आहे. मोटार अपघात न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या दाव्यावर सामंजस्याने तडजोड होऊन संबंधित कुटुंबाला 1 कोटी 8 लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. त्यामुळे पीडित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. मोटार अपघात न्यायाधिकरणाचे प्रमुख सदस्य न्यायाधीश बी. डी. कुलकर्णी आणि ॲडवोकेट अतुल गुंजाळ यांच्यासमोर हा दावा मार्गी लागला.

**महापौर**

पुणे महानगरपालिकेची महत्त्वपूर्ण प्रशासकीय आढावा बैठक आज महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अतिरिक्त आयुक्तांसह अन्य वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला, तसंच आगामी विकासकामांबाबत महत्त्वपूर्ण निर्णयही घेण्यात आले. घनकचरा व्यवस्थापन, वाहनतळ व्यवस्थापन, जुन्या इमारतींचा पुनर्विकास तसंच आरोग्य क्षेत्रात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. सर्व प्रस्तावित विकासकामं करताना सर्व विभागांनी नागरिकाभिमुख, पारदर्शक पद्धतीनं आणि वेळेत कामं पूर्ण करण्याचे निर्देश महापौरांनी यावेळी दिले.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज दिवसभर उन्हाची काहिली जाणवत होती, दुपारनंतर वातावरण काहीसं ढगाळ झालं आहे. आज कमाल तापमान 42 तर किमान तापमान 24 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही पारा 42 अंशांच्या आसपास जाईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतमध्ये उद्या संध्याकाळी सहा वाजता. नमस्कार.**